# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २४/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिकास्तरीय "उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम " CTF बैठक दिनांक २४/०५/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता स्थायी समिती सभागृह, उल्हासनगर महानगरपालिका येथे श्री. अजीज शेख, मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अजीज शेख | मा. आयुक्त तथा प्रशासक. | :- अध्यक्ष |
| २. डॉ. करूणा जुईकर | मा.अतिरिक्त आयुक्त, (वै.आ.वि) | :- उप-अध्यक्ष |
| ३. डॉ. सुभाष जाधव | उप-आयुक्त (वै.आ.वि) | :- सदस्य |
| ४. श्री. अशोक मोरे | प्रशासन अधिकारी, | :- सदस्य |
| ५. श्री. छाया पी. डांगळे | पीआरओ | :- सदस्य |
| ६. श्री. बाळासाहेब नेटके | मुख्य अग्निशमन अधिकारी | :- सदस्य |
| ७. वैद्यकीय अधिकारी, | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- १ ते ६, उमपा | :- सदस्य |
| ८. श्री. गौतम तांबे | स्नेहा फाऊंडेशन- NGO | :- सदस्य |
| ९. डॉ. किशोर चव्हाण, | SMO | :- सदस्य |

सदर बैठकीची सुरूवात डॉ. विद्या चव्हाण, शहर कार्यक्रम व्यवस्थापक, यांनी प्रस्तावना सादर करत उमपा कार्यक्षेत्रात पल्स पोलिओ मोहिमे करिता एकुण ५७९१४ लाभार्थी असून एकुण २९५ बुथ व गृहभेटी साठी १७७ टीम चे नियोजन करण्यात आले आहे अशी माहिती दिली. त्यानंतर डॉ. किशोर चव्हाण, सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर (SMO) यांनी "उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम " या अभियानाची संपूर्ण रूपरेषा Power Point Presentation द्वारे उपस्थितांना दिली.

सदर बैठकीत बैठकीचे अध्यक्ष मा. श्री. अजीज शेख, प्रशासक तथा आयुक्त, यांनी खालीलप्रमाणे चर्चा करून सुचना दिल्या.

१. आपला दवाखाना येथे पोलिओ लसीकरणाचे बुथ लावणे.
२. नविन नियुक्त केलेल्या आशांना लसीकरण मोहिमेसाठी सहभागी करणे.
३. एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, यांना सदर मोहिमेत सहभागी होण्यास माहिती देणे.
४. शैक्षणिक संस्थाना सदर मोहिमेत (NSS) यांना सहभागी करून घेणे.
५. महिला बाल विकास विभाग यांना मनुष्यबळ मिळण्यासाठीचे नियोजन करणे.
६. महिला बचत गट यांना मनुष्यबळ मिळण्यासाठी नियोजन करणे
७. सदर मोहिमेची जनजागृती अति उत्कृष्ट करण्यासाठी मराठी व सिंधी व्यतीरिक्त हिंदी बॅनर छपाई करून जनजागृती करणे.
८. वैद्यकिय अधिकारी, ना.प्रा.आ. केंद्र १ ते ६ सर्व यांनी ILR व Deep Freezer ची Backup Plan ची पडताळणी करणे.
९. सदर मोहिमेच्या बुथच्या दिवशी ८०% च्या वर लाभार्थ्यांना लाभ मिळावा याची दक्षता घेणे.
१०. स्थलांतरित वस्तीतील मुलांचे लसीकरण पूर्ण झाले किंवा नाही याचा आढावा घेणे.
११. संस्थात्मक प्रसुतीमध्ये Hep.BO **चा डोसचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.**

तसेच "पल्स पोलिओ लसीकरण मोहिम " हे अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व विभागांनी योग्य सहकार्य करणे बाबत सर्व समिती सदस्यांना विनंती करण्यात आली व उपस्थित सर्व समिती सदस्यांचे आभार मानुन सभा संपल्याचे घोषित करण्यात आले.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी